NO 2014-12-3012

26 (१७)

वाचा:-१)महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार दिनांक २१/८/२०१५, सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३१ महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५

२)महसूल व वन विभाग यांचेकडील पत्र क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र.१९४/ल-१ दि.२७/७/२०१६

३) या कार्यालयाकडील अधिसूचना क्र.भू-३/वि.नों.क्र.२०५/म.लो.ह.अ.२०१५/२०१६ पुणे,दिनांक ४/०८/२०१६

क्र.भू-३/वि.नों.क्र.२०५/म.लो.ह.अ.२०१५/२०१६
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचे कार्यालय,
पुणे, दिनांक: - ३०/१२/२०१७.

विषय:-<u>फेरफार नोंदीसाठीचा कालावधी ३० दिवसांवरुन २५ दिवस करणेबाबत.</u>

<u>दुरुस्ती अधिसूचना:-</u>

विषयांकितबाबत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३१) च्या कलम ३ (१) अन्वये या कार्यालयाकडील अधिसूचना क्र.भू-३/वि.नों.क्र.२०५/म.लो.ह.अ.२०१५/२०१६, दिनांक ४/०८/२०१६ मध्ये अ.क्र.४ (अ) मध्ये फेरफार नोंदी विवादगस्त नसल्यास त्याचा कालावधी ३० दिवस असा नमूद आहे. तसेच जमाबंदी आयुक्त, पुणे कार्यालयाकडील नागरिकांची सनद यामध्येही फेरफार नोंदी विवादगस्त नसल्यास त्याचा कालावधी ३० दिवस असा नमूद आहे.

नागरिकांना "ईज ऑफ डुईंग बिजनेस" अंतर्गत तत्पर सेवा देणेकरीता सदर कालावधी कमी करण्याबाबतची बाब इकडील कार्यालयाच्या विचाराधीन होती. सबब दिनांक ४/०८/२०१६ रोजीची अधिसुचना व नागरिकांची सनद यामध्ये नमुद फेरफार नोंदी विवादग्रस्त नसल्यास त्याचा कालावधी "३० दिवस" ऐवजी "२५ दिवस" करण्यात येत आहे.

दिनांक ४/०८/२०१६ रोजीची अधिसुचना व नागरिकांची सनद यामधील उर्वरित सर्व मजकूर/तरतुदी कायम समजणेत याव्यात.

सही/-XXX
(एस.चोक्कलिंगम्)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख(म.रा.)पुणे

प्रत:-व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, येरवडा, पुणे ४११ ००६ यांचेकडे माहिती व कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

२/-सदरची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र भाग-१ मध्ये उपविभागात प्रसिध्द करण्यात यावी.

प्रतिलिपी:-

१) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
२) मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव
३) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४) स्वीय सचिव, विरोधी पक्षनेते, विधानपरिषद व विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
५) सर्व सन्माननीय विधान परिषद/विधानसभा सदस्य व संसद सदस्य.

६) मा.प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

७) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई व नागपूर

८) सर्व विभागीय आयुक्त

९) सर्व जिल्हाधिकारी

१०) सर्व उपसंचालक भूमि अभिलेख

११) सर्व जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख

१२) प्राचार्य, भूमि अभिललेख प्रशिक्षण प्रबोधिनी, औरंगाबाद

१३) सर्व उप अधीक्षक भूमि अभिलेख/नगर भूमापन अधिकारी

१४) विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख तथा चौकशी अधिकारी (शहर मापन)/(गांवठाण)

१५) विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख(गांवठाण)/(न.भू.)(शहर मापन)

१६) सर्व कार्यालय अधीक्षक ,'जमाबंदी आयुक्त, पुणे

"नि र्ग मि त"

(किशोर तवरेज)

उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न
जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन) पुणे